# न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य : महापौर रवि लांडगे

## पूरग्रस्तांच्या मदतीसाठी महापालिका युद्धपातळीवर कार्यरत; विविध पूरग्रस्त भागांची प्रत्यक्ष पाहणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरात सुरू असलेल्या अतिमुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत महापौर रवि लांडगे यांनी दिवसभर विविध पूरग्रस्त भागांची प्रत्यक्ष पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला. पूरग्रस्त नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना तातडीने राबविण्याच्या तसेच कोणत्याही नागरिकाला अडचण निर्माण होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या कडक सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या.



महापौरांनी सर्वप्रथम चिखली प्राधिकरण परिसरातील घरकुल येथे भेट देऊन पाण्यात उतरून प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केली. यावेळी स्थानिक नागरिकांशी संवाद साधला, नागरिकांच्या भावना जाणून घेत महापौरांनी संबंधित अधिकाऱ्यांसह लवकरच संयुक्त बैठक घेऊन या समस्येवर कायमस्वरूपी आणि परिणामकारक तोडगा काढण्यासाठी कडक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले. यावेळी नगरसेवक कुंदन गायकवाड, योगिता नागरगोजे, सचिन सानप, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे तसेच स्थानिक नागरिक उपस्थित होते.

त्यानंतर महापौरांनी चिखली येथील महानगरपालिका शाळेत स्थलांतरित करण्यात आलेल्या नागरिकांची भेट घेतली. प्रत्येक कुटुंबाची विचारपूस करून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. शाळेतील निवास व्यवस्था, स्वच्छता, पिण्याचे पाणी, भोजन, औषधोपचार तसेच महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसाठी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध आहेत का, याची त्यांनी स्वतः पाहणी केली. नागरिकांच्या सन्मानाला धक्का लागणार नाही, अशा पद्धतीने सर्व सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. यावेळी नगरसेवक सोनम मोरे, विकास साने, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, सह आयुक्त मनोज लोणकर, क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच विविध विभागातील कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

यावेळी महापौर म्हणाले, "आपत्तीच्या काळात प्रशासन ही केवळ यंत्रणा नसून नागरिकांचा आधार असते. संकटाच्या या काळात प्रत्येक नागरिकाच्या पाठीशी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका खंबीरपणे उभी आहे. कोणालाही एकटे सोडले जाणार नाही."

यानंतर महापौरांनी चिखली परिसरातील इंद्रायणी नदीच्या वाढत्या पाणीपातळीची पाहणी केली. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी इतक्या वर्षांनंतर धरणातून पाणी न सोडताही नदीचे पाणी पात्राबाहेर आल्याची माहिती महापौरांच्या निदर्शनास आणून दिली. नदीकाठच्या भागातील नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक ती खबरदारी घेण्याचे तसेच परिस्थितीवर चोवीस तास लक्ष ठेवण्याचे निर्देश त्यांनी दिले.

त्यानंतर महापौरांनी कुदळवाडी येथील नाल्याची पाहणी केली. नाल्यात मोठ्या प्रमाणावर कचरा अडकल्यामुळे पाण्याचा प्रवाह अडथळला जात असल्याचे निदर्शनास आल्यानंतर संबंधित विभागाला तातडीने यंत्रसामग्री व मनुष्यबळ तैनात करून कचरा हटविण्याची तसेच पाण्याचा प्रवाह सुरळीत करण्याची कडक सूचना त्यांनी केली.

याचबरोबर महापौरांनी महानगरपालिका आयुक्त, अतिरिक्त आयुक्त तसेच सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सातत्याने संपर्क साधून दापोडी, कासारवाडी, केशवनगर, चिंचवड, रावेत, पुनावळे आणि इतर पावसामुळे प्रभावित भागांतील परिस्थितीची सविस्तर माहिती घेतली. सर्व क्षेत्रीय अधिकारी, आपत्ती व्यवस्थापन विभाग, अग्निशमन दल, आरोग्य विभाग तसेच संबंधित यंत्रणांना सतर्क राहण्याचे निर्देश देत, पूरग्रस्त किंवा बाधित नागरिकांना कोणत्याही प्रकारची अडचण होणार नाही, यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात, असे आदेश त्यांनी दिले.

महापौर रवि लांडगे यांनी नागरिकांनाही आवाहन करत सांगितले की, अफवांवर विश्वास ठेवू नये, प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, धोकादायक ठिकाणी जाणे टाळावे आणि कोणतीही आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास तात्काळ महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेशी संपर्क साधावा. नागरिकांची सुरक्षितता हीच आमची सर्वोच्च जबाबदारी असून, या संकटाच्या काळात महानगरपालिका प्रत्येक नागरिकाच्या पाठीशी पूर्ण ताकदीने उभी आहे.

# मोशीत मुसळधार पावसामुळे दाणादाण; डीपी परिसरात कमरेएवढे पाणी

## नगरसेविका अर्चना सस्ते यांनी घटनास्थळी धाव घेत प्रशासनाकडून युद्धपातळीवर मदतकार्य सुरु

**पिंपरी | प्रतिनिधी**

गेल्या काही तासांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मोशी येथील शिवाजीवाडी अंतर्गत येणाऱ्या वक्रतुंड कॉलनी परिसरात पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. या भागातील महावितरणच्या डीपी परिसरात तब्बल कमरेएवढे पाणी साचले असून, पाण्याचा निचरा न झाल्याने परिसरातील अनेक नागरिकांच्या घरांमध्ये पाणी शिरले आहे. यामुळे स्थानिक रहिवाशांचे प्रचंड हाल होत असून मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. घटनेचे गांभीर्य ओळखून स्थानिक प्रशासकीय यंत्रणा आणि





लोकप्रतिनिधींनी तातडीने धाव घेत मदतकार्याला सुरुवात केली आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नगरसेविका अर्चना सस्ते यांनी तातडीने वक्रतुंड कॉलनी परिसरात प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली.

नागरिकांच्या सुरक्षिततेचा मोठा प्रश्न निर्माण झाल्याचे पाहून, महावितरणच्या (MSEB) अधिकारी व कर्मचाऱ्यांना संपर्क साधून जीवितहानी टाळण्यासाठी तात्काळ या भागातील वीजपुरवठा खंडित करण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे (PCMC) संबंधित अधिकारी आणि अग्निशामक दलाला पाचारण करून साचलेले पाणी पंपाच्या साहाय्याने उपसण्याची आणि अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्याची व्यवस्था करण्यात आली. सध्या प्रशासनाकडून युद्धपातळीवर मदतकार्य राबवले जात आहे.

> " वक्रतुंड कॉलनीतील परिस्थिती अत्यंत बिकट असून नागरिकांच्या घरात पाणी शिरल्याने त्यांचे मोठे नुकसान झाले आहे. सध्या आमच्यासाठी नागरिकांची सुरक्षा हीच सर्वोच्च प्राथमिकता आहे. महावितरण आणि महापालिकेच्या यंत्रणेला सोबत घेऊन पाण्याचा उपसा करण्याचे काम वेगाने सुरू आहे. प्रशासनाच्या माध्यमातून आवश्यक ती सर्व मदत तात्काळ उपलब्ध करून दिली जात आहे. नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क राहावे.
>
> **- अर्चना सस्ते, नगरसेविका**

# चिखलीतील घरकुल वसाहतीला पूर आणि मैलामिश्रित पाण्याचा विळखा

## प्रशासनाचा दावा फोल, नागरिकांचे हाल, गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडमधील चिखली येथील घरकुल वसाहतीत मुसळधार पाऊस आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाचे (STP) पाणी ओव्हर फ्लो झाल्यामुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. परिसरातून वाहणारे नैसर्गिक नाले बुजवले गेल्याने पाण्याचा निचरा होण्यास कोणतीही जागा उरलेली नाही. परिणामी, हे पाणी थेट इमारतींच्या तळमजल्यावर आणि सोसायट्यांच्या आवारात शिरल्याने नागरिकांचे अतोनात हाल होत आहेत. त्यातच स्पाईन रस्त्याशेजारी असलेल्या सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पातून (STP) मैलामिश्रित घाण पाणी मोठ्या प्रमाणावर वाहू लागल्याने, हे दूषित पाणी थेट पेठ क्रमांक १७ आणि १९ मधील घरकुल वसाहतीत शिरले आहे.





यामुळे संपूर्ण परिसरात दुर्गंधी पसरली असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. विशेष म्हणजे, प्रशासनाकडून येथील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्याचा दावा करण्यात आला होता, मात्र अवघ्या दोन दिवसांच्या पावसानेच प्रशासनाचा हा दावा पूर्णपणे फोल ठरवला असून यंत्रणेचे पितळ उघडे पाडले आहे. या पावसाच्या आणि ड्रेनेजच्या दूषित पाण्यामुळे वसाहतीमधील पिण्याच्या पाण्याच्या भूमिगत टाक्या पूर्णपणे दूषित झाल्या आहेत. टाक्यांमध्ये मैलामिश्रित पाणी गेल्यामुळे नागरिकांना पिण्याच्या शुद्ध पाण्यासाठी भटकंती करावी लागत असून, जलजन्य आजारांचा मोठा धोका निर्माण झाला आहे.



> "प्रशासनाने काही दिवसांपूर्वीच सांडपाणी प्रकल्पाचे काम व्यवस्थित झाल्याचे सांगितले होते, मग अवघ्या दोन दिवसांच्या पावसात ही वसाहत पाण्याखाली का गेली? नैसर्गिक नाले बुजवणाऱ्यांवर तात्काळ कारवाई झाली पाहिजे आणि नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा तसेच आरोग्याचा प्रश्न प्रशासनाने युद्धपातळीवर सोडवला पाहिजे.
>
> **- कुंदन गायकवाड, नगरसेवक**

> घरकुल वसाहतीमधील नागरिकांची अवस्था बिकट आहे. प्रशासनाचे नियोजन पूर्णपणे कोलमडल्यामुळेच आज मैलामिश्रित पाणी लोकांच्या घरात आणि पाण्याच्या टाक्यांत शिरले आहे. आम्ही सध्या बाधित कुटुंबांच्या सुरक्षिततेसाठी आणि मदतीसाठी मैदानात आहोत, मात्र या समस्येवर पालिकेने तात्काळ कायमस्वरूपी तोडगा काढणे गरजेचे आहे."
>
> **- निलेश नेवाळे, नगरसेवक**

इमारतींच्या तळमजल्यावर गुडघाभर पाणी साचल्यामुळे सुरक्षेच्या कारणास्तव लिफ्ट तातडीने बंद करण्यात आल्या आहेत, ज्याचा सर्वाधिक फटका ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांना बसत आहे. सतत साचलेल्या पाण्यामुळे सोसायट्यांच्या सीमा भिंती खचून पडण्याची भीती निर्माण झाली असून, संपूर्ण वसाहतीमध्ये भीतीचे वातावरण आहे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या'फ' क्षेत्रीय कार्यालयामार्फत तातडीने मदतकार्य सुरू करण्यात आले असून, पालिकेचे पथक पाण्याचा निचरा करण्यासाठी घटनास्थळी तैनात झाले आहे.

# मुसळधार पावसामुळे पिंपरी-चिंचवड मनपा यंत्रणा हायअलर्टवर

## 4200 नागरिकांना सुरक्षित स्थलांतर, मदत केंद्रांमध्ये आयुक्तांकडून सोयी-सुविधांची पाहणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरात काल दुपारपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची संपूर्ण यंत्रणा सज्ज झाली असून, सर्व अधिकारी आणि कर्मचारी प्रत्यक्ष मैदानावर (फील्डवर) कार्यरत आहेत. शहरात आतापर्यंत ३२६ मिमी पावसाची नोंद झाली असून, काही सखल भागांतील रस्त्यांवर आणि घरांमध्ये पाणी साचल्याने नागरिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत प्रशासनाने सुमारे ४२०० नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित केले आहे. आपत्कालीन परिस्थिती उद्भवू नये यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासनाने वेगवेगळ्या १७ ते १८ ठिकाणी तात्काळ बोटी तैनात केल्या आहेत.





पूरबाधित नागरिकांसाठी उभारण्यात आलेल्या विविध मदत केंद्रांना महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसह प्रत्यक्ष भेट देऊन व्यवस्थेची पाहणी केली आणि नागरिकांशी संवाद साधून त्यांना धीर दिला.

प्रशासनाने नागरिकांच्या निवासासाठी शहरात चोख व्यवस्था केली असून, पिंपरी नगर येथील कमला नेहरू शाळा येथे सर्वात मोठे मदत केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्रामध्ये मिलिंदनगर, विजयनगर आणि संजय गांधी नगर भागातील २५० कुटुंबे म्हणजेच १,०८० पेक्षा अधिक नागरिकांना सुरक्षितपणे आश्रय देण्यात आला आहे.

येथे नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून जनरेटरद्वारे अखंडित प्रकाश व्यवस्था, वैद्यकीय सुविधा, जेवणाची उत्तम व्यवस्था आणि स्वच्छ शौचालये उपलब्ध करून दिली आहेत.


यासोबतच फुगेवाडी येथील लोकमान्य बाळ गंगाधर टिळक शाळा मदत केंद्रातही १८५ नागरिकांची अशीच उत्तम व्यवस्था करण्यात आली असून, तिथल्या अधिकाऱ्यांना नागरिकांची पूर्ण काळजी घेण्याचे निर्देश आयुक्त डॉ.विजय सुर्यवंशी यांनी दिले आहेत.

दरम्यान, हवामान खात्याने उद्यासाठी शहरात 'ऑरेंज अलर्ट'जारी केला असून नदीची पाणीपातळी वाढण्याची शक्यता वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. ते म्हणाले कि, "नदीकाठच्या रहिवाशांनी सुरक्षिततेसाठी प्रशासनाला सहकार्य करून तात्काळ स्थलांतरित व्हावे, नागरिकांनी नदीपात्राजवळ जाणे टाळावे, गरज असेल तरच घराबाहेर पडावे आणि कोणतीही मदत हवी असल्यास महानगरपालिकेच्या आपत्कालीन हेल्पलाईनवर संपर्क साधावा,"असे आवाहन करण्यात आले आहे.

# मोशीत मुसळधार पावसामुळे देहू-आळंदी बीआरटी रोडवर साचले कमरेएवढे पाणी

## रहिवाशांमध्ये चिंतेचे वातावरण , लोकप्रतिनिधींच्या तत्परतेने जेसीबीद्वारे पाण्याचा निचरा







**पुणे | प्रतिनिधी**

येथील परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे देहू-आळंदी बीआरटी रोडवर आणि आजूबाजूच्या सोसायट्यांसमोर मोठ्या प्रमाणावर पाणी साचून पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. देहू-आळंदी बीआरटी रस्त्यावर तर थेट कमरेपर्यंत पाणी साचल्याने वाहनचालकांची मोठी कोंडी झाली, तर अनेक वाहने पाण्यात अडकून पडली. या मुख्य रस्त्याव्यतिरिक्त शिवरस्त्यावरील घरांसमोर आणि विविध सोसायट्यांच्या मुख्य प्रवेशद्वारांसमोर पाण्याचे मोठे तळे साचल्याने नागरिकांना घराबाहेर पडणेही कठीण झाले होते. पाण्याचा वेगाने निचरा होत नसल्याने सोसायट्यांमधील तळघरांमध्ये आणि आवारात पाणी शिरण्याची भीती निर्माण झाली होती, ज्यामुळे रहिवाशांमध्ये चिंतेचे वातावरण होते.

या गंभीर परिस्थितीची माहिती मिळताच स्थानिक लोकप्रतिनिधींनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. नगरसेवक निखिल बोऱ्हाडे आणि नगरसेविका सुजाता बोराटे यांनी परिस्थितीची पाहणी करून तातडीने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन आणि संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. रस्त्यावरील पाण्याचा निचरा करण्यासाठी त्यांनी महापालिकेच्या यंत्रणेला तातडीने पावले उचलण्याचे निर्देश दिले.

अधिकाऱ्यांशी समन्वय साधून नगरसेवक निखिल बोऱ्हाडे आणि नगरसेविका सुजाता बोराटे यांनी तातडीने घटनास्थळी जेसीबी मशीन मागवून घेतली. रस्त्याशेजारील पाण्याचा प्रवाह अडकलेले अडथळे आणि कचरा जेसीबीच्या साहाय्याने हटवण्यात आला, ज्यामुळे साचलेल्या पाण्याचा मार्ग मोकळा झाला. लोकप्रतिनिधींनी स्वतः उपस्थित राहून युद्धपातळीवर हे काम करून घेतल्यामुळे काही तासांतच रस्त्यावरील आणि सोसायट्यांसमोरील पाण्याचा निचरा झाला. लोकप्रतिनिधींनी दाखवलेल्या या तत्परतेमुळे आणि महापालिका प्रशासनाच्या त्वरित कारवाईमुळे मोशी परिसरातील नागरिकांना आणि वाहनचालकांना मोठा दिलासा मिळाला असून, संभाव्य मोठे नुकसान टळले आहे.

# मध्यरात्री पाण्याचा हाहाकार; प्रज्ञानबोधीनी शाळेच्या अतिक्रमणामुळे ताम्हाणेवस्तीत पूर

## प्रज्ञानबोधीनी शाळेने जवळच असलेल्या नैसर्गिक नाल्यावर केलेल्या मोठ्या अतिक्रमणामुळे पावसाच्या पाण्याचा निचरा होऊ शकला नाही.



**पुणे | प्रतिनिधी**

जावजीबुवा हौसिंग सोसायटी, ताम्हाणेवस्ती परिसरात काल मध्यरात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे भीषण परिस्थिती निर्माण झाली. स्थानिक प्रज्ञानबोधीनी शाळेने जवळच असलेल्या नैसर्गिक नाल्यावर केलेल्या मोठ्या अतिक्रमणामुळे पावसाच्या पाण्याचा निचरा होऊ शकला नाही.

परिणामी, नाल्याचे पाणी तुंबून ते थेट शेजारील जावजीबुवा हौसिंग सोसायटी आणि ताम्हाणेवस्तीमधील नागरिकांच्या घरांमध्ये शिरले. मध्यरात्री अचानक घरात पाणी शिरल्याने नागरिकांची एकच तारांबळ उडाली आणि परिसरात भीतीचे वातावरण पसरले. पाण्याचा प्रवाह इतका प्रचंड होता की, रस्त्यावर आणि सोसायट्यांच्या आवारात पार्क केलेल्या अनेक रिक्षा आणि दुचाकी वाहने या पुरात वाहून गेल्या, ज्यामुळे नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या घटनेमुळे संतप्त झालेल्या स्थानिक नागरिकांनी प्रज्ञानबोधीनी शाळेच्या प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला असून, प्रशासनाने या नाल्यावरील अनधिकृत अतिक्रमणावर त्वरित आणि कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

> **"प्रज्ञानबोधीनी शाळेने नाल्यावर केलेले अतिक्रमण हे अत्यंत बेजबाबदारपणाचे आहे. त्यांच्या या कृत्यामुळे आज ताम्हाणेवस्ती आणि जावजीबुवा सोसायटीमधील शेकडो नागरिकांचे संसार पाण्यात गेले असून अनेकांच्या वाहनांचे अतोनात नुकसान झाले आहे. नागरिकांच्या जिवाशी खेळणारा हा प्रकार मी खपवून घेणार नाही. महापालिका प्रशासनाने तात्काळ या अतिक्रमणावर बळीराजा आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कठोर बुलडोझर कारवाई करावी, अन्यथा आम्ही नागरिकांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडू.**
>
> **- संगितानानी ताम्हाणे, नगरसेविका**

# वारीसाठी पुणे पोलिसांची 'हायटेक' सुरक्षा व्यवस्था

## 244 एआय कॅमेरे, ड्रोन, चेहरा ओळखणारी यंत्रणा : आठ हजारांहून अधिक पोलिसांचा तगडा फौजफाटा

**पुणे | प्रतिनिधी**

आषाढी वारी म्हटले की लाखो वारकरी, भक्तिभावाचा महासागर आणि त्याचबरोबर सुरक्षेचे मोठे आव्हान. मात्र, यंदा पुणे पोलिसांनी या आव्हानावर अत्याधुनिक तंत्रज्ञानाची भक्कम ढाल उभी केली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), ड्रोन, चेहरा ओळखणारी यंत्रणा, जीपीएस ट्रॅकिंग, अत्याधुनिक सीसीटीव्ही नेटवर्क आणि आठ हजारांहून अधिक पोलिसांच्या तगड्या फौजफाट्याच्या बळावर यंदाची वारी सुरक्षा व्यवस्थेत पार पडणार आहे. संशयित व्यक्ती कॅमेऱ्यात दिसताच नियंत्रण कक्षाला तत्काळ इशारा, गर्दी धोक्याच्या पातळीवर पोहोचताच एआय प्रणालीकडून स्वयंचलित अलर्ट आणि हवेतून ड्रोनची करडी नजर अशी चौफेर सुरक्षा व्यवस्था उभारण्यात आल्याची माहिती पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली.

यावेळी अपर पोलिस आयुक्त संजय पाटील, मनोज पाटील, राजेश बनसोडे, तेजस्वी सातपुते, पोलिस उपायुक्त गोहर हसन, संदीप भाजीभाकरे, मिलिंद मोहिते, जीवन बेनीवाल, अविनाश कुमार, सागर कवडे, प्रशांत अमृतकर, राजलक्ष्मी शिवणकर, कृषीकेश रावले, पी. आर. पाटील, सहायक पोलिस आयुक्त विवेक पवार यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले की, ९ ते १२ जुलैदरम्यान संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या पुणे शहरात मुक्कामी असतील. या कालावधीत लाखो वारकरी पुण्यात दाखल होणार असल्याने सुरक्षा, वाहतूक, गर्दी नियंत्रण आणि आपत्कालीन प्रतिसादासाठी स्वतंत्र नियोजन केले आहे. यंदा प्रथमच पालखी मार्गावर एकूण २४४ कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित कॅमेरे कार्यरत राहणार आहेत.

त्यापैकी संत तुकाराम महाराज पालखीमार्गावर १२५, तर संत ज्ञानेश्वर महाराज पालखीमार्गावर १०१ कॅमेरे बसविले आहेत. याशिवाय २८ फेशियल रेकग्निशन कॅमेऱ्यांद्वारे पोलिसांच्या अभिलेखातील सराईत गुन्हेगार, फरारी आरोपी किंवा संशयित व्यक्तींची ओळख पटविली जाणार आहे. गर्दीची घनता, वाहनांची हालचाल, संशयास्पद वस्तू, महिलांची सुरक्षा आणि भांडणांसारख्या घटनांवरही एआय प्रणाली सतत लक्ष ठेवणार आहे. पालखीच्या रथांवर आणि मिरवणुकीच्या पुढे-मागे १२ जीपीएस उपकरणे बसविली आहेत. त्यामुळे पालखीचे थेट स्थान नियंत्रण कक्षासह नागरिकांनाही उपलब्ध होणार आहे.

हवेतून निगराणीसाठी ड्रोनचा वापर केला जाणार असून, अनधिकृत ड्रोन रोखण्यासाठी विशेष अँटी-ड्रोन यंत्रणा सज्ज ठेवली आहे. गर्दीच्या ठिकाणी तातडीने निर्णय घेण्यासाठी पाच मोठी आणि एकोणीस मिनी मोबाईल कमांड वाहने तैनात केली आहेत. ही वाहने फिरते नियंत्रण कक्ष म्हणून कार्यरत राहतील. याशिवाय ५०० ठिकाणी ध्वनिक्षेपक व्यवस्था, ३०० वॉकी-टॉकी, वायरलेस संच, डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर, हँड मेटल डिटेक्टर, स्फोटक शोधक व नाशक पथक आणि श्वान पथकाची विशेष नियुक्ती केली आहे. महिलांच्या सुरक्षेला विशेष प्राधान्य दिले आहे.



### ...असा असेल तगडा फौजफाटा

» ४ अपर पोलिस आयुक्त,१३ पोलिस उपायुक्त,३० सहाय्यक पोलिस आयुक्त,१८२ पोलिस निरीक्षक,५७० सहायक पोलिस निरीक्षक व उपनिरीक्षक,६ हजार ५५२ पोलिस कर्मचारी,राज्य राखीव पोलिस दलाच्या ३ तुकड्या,१ हजार २५० होमगार्ड.

### वारी बंदोबस्त एका नजरेत...

» २४४ कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित कॅमेरे,२८ चेहरा ओळखणारी यंत्रणा,१२ जीपीएस उपकरणे,ड्रोन व अँटी-ड्रोन प्रणाली कार्यान्वित,५ मोठी, १९ मिनी मोबाईल कमांड वाहने,५०० ठिकाणी ध्वनिक्षेपक व्यवस्था,३०० वॉकी-टॉकी संच,३० डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर,५० हँड मेटल डिटेक्टर,१२ जलद प्रतिसाद पथके,६ स्फोटक शोधक व नाशक पथके.

“ वारीदरम्यान नागरिकांना पालखीचे थेट स्थान, वाहतूक बदल, बंद रस्ते आणि पर्यायी मार्गांची माहिती डिजिटल माध्यमातून उपलब्ध करून दिली जाणार आहे. आपत्कालीन परिस्थितीत '११२' क्रमांकावर संपर्क साधा पारंपरिक बंदोबस्तासोबत अत्याधुनिक तंत्रज्ञानाची प्रभावी सांगड घालण्यात आली आहे. सुरक्षित, शिस्तबद्ध आणि सुरळीत वारीसाठी पुणे पोलीस पूर्णपणे सज्ज आहेत.

- - अमितेश कुमार, पोलिस आयुक्त पुणे.

# कळमोडी धरण चौथ्या वर्षीही शंभर टक्के भरले: सांडव्यातून 6,759 क्युसेक्स विसर्ग

## धरण पूर्ण क्षमतेने भरताच सांडव्यातून 6,759 क्युसेक्स वेगाने विसर्ग आरळा नदीपात्रात सुरु झाला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

खेड तालुक्यातील पश्चिम व पूर्व पट्टा तसेच आंबेगाव तालुक्यातील सातगाव पठारासाठी जीवनदायिनी ठरलेले कळमोडी धरण सोमवारी (दि.६) रात्री शंभर टक्के भरले. धरण पूर्ण क्षमतेने भरताच सांडव्यातून ६,७५९ क्युसेक्स वेगाने विसर्ग आरळा नदीपात्रात सुरू झाला आहे. याबाबत धरण प्रशासनाचे उपविभागीय अधिकारी संतोष शिंदे यांनी माहिती दिली.


विशेष म्हणजे, सलग चौथ्या वर्षी कळमोडी धरण शंभर टक्के भरले आहे. यामुळे खेडच्या पश्चिम भागातील नागरिक, शेतकरी आणि पाणीपुरवठा योजनांवर अवलंबून असलेल्या गावांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. यंदा धरणात ४२.८७ दशलक्ष घनमीटर (१.५१४ टीएमसी) इतका जलसाठा झाला आहे.

सन २०१० पासून कळमोडी धरण पूर्ण क्षमतेने भरू लागले आहे. या धरणाला कोणत्याही प्रकारचे दरवाजे नाहीत. त्यामुळे धरण भरताच सांडव्यातून आपोआप पाण्याचा विसर्ग सुरू होतो. धरण परिसरात गेल्या काही दिवसांपासून झालेल्या समाधानकारक पावसामुळे जलसाठ्यात झपाट्याने वाढ झाली.

१ जूनपासून धरण क्षेत्रात ५२६ मिमी पावसाची नोंद झाली आहे. गतवर्षी कळमोडी धरण २४ जून रोजी भरले होते. तर यंदा ते ११ दिवस उशिराने ६ जुलै रोजी पूर्ण क्षमतेने भरले. धरण भरल्यामुळे चासकमान धरणाच्या जलसाठ्यातही वाढ होण्यास मदत होणार आहे.

कळमोडी प्रकल्पामुळे चिखलगाव, साकुर्डी, देवोशी, कुडे, बांगरवाडी, येनिये, घोटवडी यांसह अनेक गावांना मोठ्या प्रमाणावर सिंचनाचा लाभ होतो. तसेच पश्चिम भागातील अनेक गावांच्या पाणीपुरवठा योजना या धरणावर अवलंबून असल्याने पिण्याच्या पाण्याची चिंता दूर झाली आहे. धरण भरल्याने शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण असून खरीप हंगामासाठीही मोठा दिलासा मिळाला आहे.

दरम्यान, धरण परिसरातील दगडी साठा तातडीने बाहेर काढावा तसेच चिखलगाव-डामसे वस्ती येथे पुलकम बंधारा उभारावा, अशी मागणी कळमोडी प्रकल्प संघर्ष समितीचे अध्यक्ष व माजी सरपंच बाळासाहेब गोपाळे आणि ग्रामस्थांकडून सातत्याने केली जात आहे.



### ग्रामस्थांनी सतर्क रहावे

» आरळा नदीपात्रालगतच्या सर्व गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. नदीपात्रातील शेतीची अवजारे, साहित्य तसेच जनावरे तातडीने सुरक्षित स्थळी हलवावीत. नागरिकांनी नदीपात्रात जाणे टाळावे, असे आवाहन धरण प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.